सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

# कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग,मुंबई. ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२

Website:-www.doa.maharashtra.gov.in Email:-directorateofart@gmail.com

**क्रमांक:-डिओअे-२०२६/तीन/E-३४२८९०४**

# परिपत्रक

विषय : ६६ वे महाराष्ट्र राज्यकला प्रदर्शन २०२६-२७.
विद्यार्थी विभाग ऑनलाईन पध्दतीने कलाकृती सादर करण्याबाबत.

दृश्यकला क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांचा विकास व्हावा याकरिता महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक उपक्रम म्हणून दरवर्षी कला संचालनालयामार्फत विद्यार्थी विभागाचे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन महाराष्ट्रातील कोणत्याही एका जिल्ह्यात आयोजित करण्यात येते. त्यानुसार सन २०२६-२७ या वर्षीचे ६६ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन सिंधुदुर्ग जिल्ह्यातील “सावंतवाडी” येथे आयोजित करण्याचे नियोजित आहे. त्यासाठी कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अखत्यारितील शासकीय, शासनमान्य अशासकीय कला संस्थांना तसेच राज्यातील शासनमान्य व विद्यापीठांशी संलग्नीत कला महाविद्यालये यांना कळविण्यात येते की, विद्यार्थी विभागाचे सन २०२६-२७ चे ६६ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनाकरिता विद्यार्थ्यांच्या कलाकृती ऑनलाईन पध्दतीने खालीलप्रमाणे स्विकारण्यात येणार आहे.

| ऑनलाईन पध्दतीने कलाकृती स्विकारण्याचा कालावधी | ऑनलाईन पध्दतीने कलाकृती स्वीकारण्याचे संकेतस्थळ | ऑनलाईन इमेज साईज | फाईल फॉरमॅट |
|---|---|---|---|
| दि.१६/११/२०२६ ते दि.२३/११/२०२६ | doa.maharashtra.gov.in | डिजिटल इमेज ही 'JPEG' फॉरमॅटमध्ये असावी. प्रतिमेचा आकार (Image Size) किमान २१०० पिक्सेल असावा आणि तो कमाल २५०० पिक्सेलपेक्षा अधिक नसावा." | "डिजिटल इमेज ही 'JPEG' फॉरमॅटमध्येच असावी. इमेज फाईलचे नाव (File Name) खालील नमुन्याप्रमाणे असावे: **विद्यार्थ्याचे नाव_विभाग_कलाकृतीचे शीर्षक_कलाकृतीचे माध्यम_कलाकृतीची किंमत**" |

तरी विद्यार्थ्यांच्या कलाकृती निर्देशित तारखांना सादर करण्याची व्यवस्था संबंधित संस्थेच्या अधिष्ठाता / प्राचार्य / विभागप्रमूख यांनी करावी.

२. ऑनलाइन पद्धतीने विद्यार्थ्यांच्या कलाकृती सादर करताना संबंधित संस्थेचे अधिष्ठाता, प्राचार्य किंवा विभागप्रमुखांनी कला संचालनालयामार्फत देण्यात आलेला संस्थेचा अधिकृत 'रजिस्ट्रेशन आयडी' (Registration ID) व 'पासवर्ड' (Password) वापरून **doa.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर लॉगिन करावे. लॉगिन केल्यानंतर, याच आयडीवरून आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांच्या कलाकृतींची व त्यांच्याविषयीची सर्व आवश्यक माहिती अचूक भरावी.

३. **ऑनलाइन सादर केलेल्या डिजिटल इमेजेसवरूनच प्रदर्शनासाठी कलाकृतींची प्राथमिक निवड केली जाईल. प्रदर्शनासाठी निवडण्यात आलेल्या कलाकृतींची अंतिम यादी उपरोक्त संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल..**

६. प्रदर्शनासाठी निवड झालेल्या मूळ कलाकृती स्विकारण्याच्या तारखा आणि ठिकाण संकेतस्थळावर जाहीर केले जाईल. निवड झालेल्या मूळ कलाकृती संचालनालयात विहित मुदतीत प्राप्त झाल्यानंतर, त्यांमधूनच पारितोषिकांसाठी सर्वोत्तम कलाकृतींची निवड केली जाईल. पारितोषिक विजेत्या कलाकारांची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**७. सदर तारखात काही बदल झाल्यास तसे** doa.maharashtra.gov.in **या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.**

८. वरील प्रक्रियेबाबत अद्ययावत सूचना वेळोवेळी उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. तरी संबंधितांनी वेळोवेळी सदर संकेतस्थळाला भेट देऊन अद्ययावत माहिती प्राप्त करुन घ्यावी. तसेच प्रदर्शनाच्या अनुषंगाने अटी शर्तीचे माहितीपत्रक सोबत जोडले आहे.

Digitally signed by
Kishor Digambar Ingale
Date: 22-09-2026
11:07:06

(डॉ.किशोर इंगळे)
कला संचालक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१. अधिष्ठाता/ प्राचार्य / विभागप्रमूख, कला संचालनालयाच्या अखत्यारितील सर्व शासकीय, शासनमान्य अशासकीय कला संस्था (महाराष्ट्र राज्य)
२. सर्व विद्यापीठांशी संलग्नीत शासनमान्य कला संस्था (महाराष्ट्र राज्य)
३. प्रदर्शन अधिकारी, ६६ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन-२०२६-२७
४. निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. निवड नस्ती.

# ६६ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन

## माहितीपत्रक

## (विद्यार्थी विभाग)

प्रदर्शनाच्या आयोजनाच्या दृष्टीने सुलभता यावी व चित्रकला संस्थेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना विशेष वाव मिळावा या हेतूने सन १९६९ पासून राज्य कला प्रदर्शनाचे दोन विभाग करुन (१) कला संस्थेतील विद्यार्थी व (२) व्यावसायिक कलाकार अशी दोन स्वतंत्र प्रदर्शन भरविण्याचे ठरविण्यांत आले. विद्यार्थी विभागाच्या प्रदर्शनासाठी खालीलप्रमाणे विभाग ठरविण्यात आले आहेत.

१) चित्रकला व रंगकला (रेखा व रंगकला) २) शिल्पकला ३) उपयोजित कला
४) कला शिक्षक प्रशिक्षण ५) कला व व्यवसाय (कला व हस्तव्यवसाय)
६) मुलभूत अभ्यासक्रम ७) दिव्यांग

महाराष्ट्र राज्यातील कला संचालनालयाच्या अखत्यारीतील शासकीय व शासनमान्य अशासकीय कला संस्थांतील, तसेच राज्यातील शासनमान्य व विद्यापीठांशी संलग्न कला महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे प्रवेश अर्ज दिनांक १६/११/२०२६ ते २३/११/२०२६ या कालावधीत doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने स्विकारले जातील.

ऑनलाइन प्राप्त झालेल्या डिजिटल इमेजेसवरूनच प्रदर्शनासाठी कलाकृतींची प्राथमिक निवड केली जाईल. निवडण्यात आलेल्या कलाकृतींची यादी उपरोक्त संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. प्रदर्शनासाठी निवड झालेल्या मूळ कलाकृती स्विकारण्याच्या तारखा व ठिकाण संकेतस्थळावरच जाहीर केले जाईल. संबंधित विद्यार्थ्यांनी त्यांच्या निवडक मूळ कलाकृती संचालनालयाने निश्चित केलेल्या मुदतीत आणि दिलेल्या ठिकाणी पाठवणे आवश्यक आहे. नियोजित वेळेनंतर प्राप्त होणाऱ्या कलाकृती कोणत्याही परिस्थितीत स्विकारल्या जाणार नाहीत.

प्रर्शनाकरिता निवड झालेल्या कलाकृती संचालनालयास प्राप्त झाल्यानंतर त्यातून पारितोषिकाकरिता कलाकृतींची निवड करण्यात येईल. पारितोषिक विजेते कलाकारांची यादी संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

प्रदर्शनासाठी कलाकृतींचे आकार खालील तक्त्याप्रमाणे असावेत :-

| अ.क्र. | विषय | फ्रेमसह कमीत कमी आकार | फ्रेमसह जास्तीत जास्त आकार |
|---|---|---|---|
| १ | मुलभूत | ४० सें.मी. x ३० सें.मी. | ४० सें.मी. x ६० सें.मी. |
| २ | चित्रकला व रंगकला आणि कला शिक्षण प्रशिक्षण | ४० सें.मी. x ३० सें.मी. | १२० सें.मी. x ९० सें.मी. |
| ३ | उपयोजित कला | ४० सें.मी. x ३० सें.मी. | ७५ सें.मी. x ५० सें.मी. |
| ४ | शिल्पकला | ६ घनफुटांपेक्षा जास्त नसावा | जास्तीत जास्त वजन १०० किलोग्रॅम असावे. |

**कलाकृती पाठविण्याबाबतच्या सूचना** :-

१) या प्रदर्शनासाठी एका स्पर्धकाला एका विभागात जास्तीत जास्त दोन कलाकृती पाठविता येतील.
२) विद्यार्थ्यांनी कलाकृती सादर करतांना वस्तुचित्राची (Object Drawing) पुर्ण असाईनमेंट सादर करावी.
३) या प्रदर्शनात कला संस्थेमधून भाग घेणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाने आपल्या कलाकृती संस्था प्रमुखांमार्फत doa.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन स्वरुपात पाठविणे बंधनकारक आहे.

४) प्रत्येक कला संस्थेने (शासकीय, शासनमान्य अशासकीय आणि विद्यापीठांशी संलग्न) प्रदर्शनासाठी कलाकृतींची निवड करताना त्यांमधील कलामूल्यांचा सर्वसमावेशक विचार करावा. अधिकाधिक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याच्या मूळ हेतूबरोबरच, कला प्रदर्शनाचा उच्च दर्जा राखणे हा महत्त्वाचा दृष्टिकोन महाविद्यालयाच्या अध्यापकांनी नजरेसमोर ठेवावा. कला संस्थांच्या अधिष्ठाता किंवा प्राचार्यांनी आपल्या कला अध्यापकांच्या सहकार्याने सुयोग्य विचारविनिमय करून दर्जेदार कलाकृतींचीच निवड करावी. परीक्षण मंडळाच्या (Jury) निकषांवर पात्र ठरलेल्या सर्व कलाकृती प्रदर्शनात प्रदर्शित करण्यात येणार आहत. प्रदर्शनासाठी निवडावयाच्या कलाकृतींच्या संख्येवर परीक्षण मंडळाला कोणतेही बंधन किंवा मर्यादा असणार नाही, याची अधिष्ठाता व प्राचार्यांनी नोंद घ्यावी.

५) **"प्रदर्शनासाठी पाठवण्यात येणारी कलाकृती ही कोणत्याही दुसऱ्या कलाकृतीची प्रतिकृती (नक्कल), अनुकरण किंवा कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) वापर करून तयार केलेली नसावी. असे आढळून आल्यास महाविद्यालय तसेच विद्यार्थ्यांवर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. ही कलाकृती स्पर्धकाने स्वतः तयार केली असल्याचे प्रमाणपत्र विद्यार्थ्यांनी संबंधित संस्थेच्या अधिष्ठाता किंवा प्राचार्यांकडून घेणे बंधनकारक आहे. प्रदर्शनासाठी निवड झालेली कलाकृती संचालनालयात जमा करताना हे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे; त्याशिवाय कलाकृती स्विकारली जाणार नाही."**

६) अश्लील, वादग्रस्त, धार्मिक वाद अथवा सामाजिक तेढ निर्माण करू शकणारे विषय, तसेच जातीभेदावर आधारित आशय असलेल्या कलाकृती प्रदर्शनासाठी कोणत्याही परिस्थितीत स्विकारल्या जाणार नाहीत. याबाबतच्या स्पष्ट सूचना सर्व कलाविद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्थाप्रमुखांची राहील, याची नोंद घ्यावी.

७) सोबत दिलेला तक्ता आणि त्यामध्ये नमूद केलेली सर्व प्रमाणपत्रे पूर्णपणे भरून कलाकृतीसोबत पाठवणे बंधनकारक आहे.

८) पाठविण्यात येणाऱ्या चित्रांना व्यवस्थित चौकट (फ्रेम) (माउंट) करुन पाठविण्याची व्यवस्था करावी.

९) विद्यार्थी विभागाचे प्रदर्शन राज्यातील सुनिश्चित केलेल्या एका ठिकाणी दाखविण्यात येणार असल्यामुळे वाहतुकीमध्ये कलाकृतींचे नुकसान होऊ नये म्हणून कलाकृतीच्या फ्रेममध्ये काचेचा वापर करु नये. त्याऐवजी अॅक्रेलिक शिटचा वापर करणे बंधनकारक राहील. त्याशिवाय कलाकृती स्विकारली जाणार नाही.

१०) प्रदर्शनासाठी निवड झालेल्या प्रत्येक कलाकृतीसोबत दोन लेबल असावीत. त्यापैकी एक कलाकृतीच्या मागे चिकटविण्यात येऊन दुसरे धाग्याने कलाकृतीला बांधावे.

११) लेबलवर खालील माहिती देण्यात यावी :-

✄.......................................✄..................................✄.............,.............

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन रजिस्टर आयडी | : | ............................................... | |
| | सहभागी विभाग (✓) | : | चित्रकला व रंगकला (रेखा व रंगकला)/ शिल्पकला/<br><br>उपयोजित कला / कला शिक्षक प्रशिक्षण / कला व व्यवसाय (कला व हस्तव्यवसाय)/<br><br>मुलभूत अभ्यासक्रम / दिव्यांग | |
| | कलाकृतीचे शिर्षक | | ............................................ | |
| | कलाकृतीची विक्री किंमत | | ............................................ | |

✄...................✄...............................✄............................✄.......✄.........✄.

१२) ज्या पार्सलवर अतिरिक्त भाडे आकारणी (To-Pay/Due) प्रलंबित असेल किंवा ज्यांचे टपाल भाडे अर्धवट भरलेले असेल, अशी पार्सल स्विकारली जाणार नाहीत..

**१३) प्रदर्शनाकरिता निवड झालेल्या कलाकृती पाठविल्यानंतर कलाकृतीबाबत योग्य ती काळजी घेतली जाईल. परंतु कुठल्याही नैसर्गिक वा अन्य कारणाने नुकसान झाल्यास, अथवा हरवल्यास त्यास कला संचालनालय जबाबदार राहणार नाही. संबंधितांनी आवश्यक वाटल्यास कलाकृतीचा विमा उतरवावा.**

१४) प्रदर्शनात दाखल होणाऱ्या कलाकृतींचे स्मरणिका (कॅटलॉग) किंवा इतर शासकीय प्रसिध्दी पुस्तके इत्यादींसाठी प्रतिकृती तयार करण्याचा हक्क कला संचालनालयाकडे राहील.

**१५) प्रदर्शन समाप्तीनंतर जमा केलेल्या कलाकृती १० दिवसांच्या कालावधीमध्ये घेऊन जाण्याची व्यवस्था संबंधितांनी करावी. या मुदतीत कलाकृती घेवून न गेल्यास सदर कलाकृतीवर संबंधितांचा हक्क राहणार नाही. तसेच सदर कलाकृतींबाबत योग्य तो निर्णय घेवून त्यावर कार्यवाही करण्याचा हक्क संचालनालयाकडे राहील, याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.**

१६) कुठल्याही कारणासाठी प्रदर्शनाच्या मुदतीत कलाकृती परत मिळणार नाहीत. ज्या स्पर्धकांनी विद्यार्थी विभागात कलाकृती पाठविल्या असतील त्यांना व्यावसायिक कलाकारांच्या प्रदर्शनास कोणत्याही विभागात भाग घेता येणार नाही. तसे आढळल्यास अशा कलाकृती प्रदर्शन प्रक्रियेच्या कुठल्याही टप्प्यावरुन बाद होतील, याची नोंद घ्यावी.

१७) बक्षिसपात्र व गुणवत्ता प्रमाणपत्रधारक विद्यार्थी कलाकारांना प्रदर्शनाच्या उदघाटन समारंभास उपस्थित राहण्यासाठी व परत जाण्यासाठी ते ज्या संस्थेचे विद्यार्थी असतील त्या स्थळापासून मुख्य प्रदर्शनाच्या स्थळापर्यंत रेल्वेचे (दुस-या वर्गाचे) अथवा साध्या एस.टी. बसचे सवलतीचे भाडे शासनातर्फे देण्यांत येईल. **प्रदर्शन स्थळापर्यंत येतानाचे प्रवास भाड्याचे तिकिट जमा करणे आवश्यक आहे**.

१८) प्रदर्शनासाठी निवड झालेल्या, प्रदर्शनासाठी परिक्षकांनी अंतिम पारितोषिक प्राप्त ठरविलेल्या कलाकृतीबाबतचे सर्व निर्णय हे कला संचालक आणि प्रदर्शन समितीसह परीक्षक समितीचे असतील.

**१९) अंशकालीन अभ्यासक्रमाचे विद्यार्थी तसेच जोड अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांस या प्रदर्शनात भाग घेता येणार नाही.**

२०) महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनात भाग घेतलेल्या कलाकृतीबाबत काही वाद अथवा पेचप्रसंग उद्भवल्यास त्यावर निर्णय घेण्याच्या अंतिम अधिकार हा प्रदर्शन समिती तसेच कला संचालकांचा राहील.

---------- x ----------